# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग

### कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.६, पुणे-१

### नागरिकांची सनद

# सुची


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | रा.म.विभाग क्र.६, पुणे कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | |
| ३ | रा.म.विभाग क्र.६ ची रचना | |
| ४ | रा.म.विभाग क्र.६, पुणे अंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक माहितीची सुलभता व खाजगीकरण | |
| ५ | रा.म.विभाग क्र.६, पुणे च्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता | |
| ६ | गा-हाण्यांचे निराकरण, सनदेचा आढावा व जन सामान्यांच्या सूचना | |
| ७ | सनदेची अंमलबजावणी व प्रतिसाद | |
| ८ | परिशिष्टे | |

**१) प्रस्तावना**

सार्वजनिक बांधकाम विभागाला १५० वर्षांहून अधिक वर्षांची गौरवशाली परंपरा आहे. ही परंपरा गेल्या ३३ वर्षापासून आजतागायत यशस्वीरित्या विभागात कार्यरत आहे. विद्येचे माहेर, ऐतिहासीक पेशवाईचे मुख्यालय धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जोपासणा-या पुण्य अशा पुणे नगरी मध्ये पुणे लष्कर भागात राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.६ चे कार्यालय पूर्वीचे एम्पायर सिनेमा जवळ तथा प्रसिध्द अशा दस्तुर हायस्कूल शेजारी पुणे १ या ठिकाणी कार्यरत आहे.

या विभागाच्या अखत्यारीतील पुणे जिल्हयातील पुणे सोलापूर रस्ता रा.म. क्र.९ व कात्रज (घाटरस्ता) ते कात्रज जुना बोगदा ते शिंदेवाडी या विशेष राज्यमार्गाची देखभाल व दुरुस्तीची कामे या विभागामार्फत केली जातात.

या विभागाचे कार्यक्षेत्रात मुखत्वे करुन पुणे सोलापूर रस्ता रा.म.क्र. ९ ची कि.मी.८/८०० ते किमी.१४/० दुपदरी मार्ग व कि.मी.१४/० ते किमी ४०/० चौपदरी मार्ग (खाजगीकरणांतर्गत) तसेच पुणे बेंगलोर रस्ता रा.म. क्र ४ ची दर्जावनत लांबी विशेष राज्य मार्ग घोषित करणेत आलेली कि.मी. ८२४/५०० ते ८३४/० इतकी लांबी आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.६, पुणे हे कार्यालय पुणे जिल्हयातील सार्वजनिक बांधकामांच्या अनुषंगाने नागरिकांशी बांधीलकी जपण्यास कटीबध्द आहे. ही बांधीलकी रा.म. विभाग क्र. ६, पुणे येथील हे कार्यालय या सनदेव्दारे जाहीर करीत असून ते स्विकारत आहे. हे कार्यालय नागरिकांना खालील प्रमाणे सुविधा पुरविण्यास बांधील आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शक केलेल्या सर्व रस्त्यांविषयीच्या सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणुकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे प्रश्न सहानुभुतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेवून सर्वसामान्य नागरिकां पासून सर्व मान्य नागरिकांपर्यंत सर्वांसाठी ही सनद तयार करण्यांत आली असून खालील बाबींकरीता जबाबदार आहे.

१. या कार्यालयाच्या अखत्यारीतील मार्गांची देखभाल दुरुस्ती मानकाप्रमाणे करुन रस्त्याचा दर्जा उत्तम राखणे.
२. या कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील उपरोल्लेखित रस्त्याची कामे सा.बां. खात्याने ठरविलेल्या मानकानुसार उत्तम दर्जाची व सुरक्षित अशी करणे.
३. या विभागाचे अधीन कार्यरत असणा-या उपविभागांना तांत्रिक सल्ला देणे व कामकाजात सुसुत्रता ठेवणे.
४. विभागीय कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.
५. आपत्कालीन व्यवस्थेसाठी तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे व मदत करणे.
६. या कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदा-या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.
७. या विभागाच्या कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गा-हाणी/तक्रारी ऐकणे व त्याचे प्रभावीपणे निराकरण करणे.
८. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत मागितलेली माहिती संबंधितांना विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे.
९. कार्यालयीन कामकाजात सातत्य ठेवून आधुनिकतेचा वापर करुन सा.बां. विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.
१०. संगणकी करणातुन सा.बां. विभागातील कार्यालये नेटवर्क जोडून त्या माध्यमातून आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्नशील राहणे.
११. या कार्यालयाशी संबंधीत सर्व आवश्यक व विविध अद्यावत माहिती त्वरीत बांधकाम विभागाचे www.mahapwd.com या वेबसाईटवर अदयावत व उपलब्ध करणे.
१२. कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अदयावत करणे व त्याची वर्गवारी करुन अभिलेख कक्ष नोंदवहीसह अदयावत करणे.
१३. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

**२) <u>राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. ६, पुणे कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी.</u>**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना रा.म. विभाग क्र. ६, पुणे

**अ)** सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

**ब)** सौजन्यपूर्ण व मदतीची भावना ठेवून कामांचा वेळेत निपटारा करेल.

**क)** पारदर्शकता व निष्ठा ठेवील यासाठी वेळोवेळी विविध परवानापत्रे/ प्रमाणपत्रे/ ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी कार्यपध्दती, इतर पत्रके नागरिकांचे माहितीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

**नागरिकांची जबाबदारी -**

- शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.
- नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.
- नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.
- विहीत केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पूरविण्याचा आग्रह धरु नये.
- सार्वजनिक मालमत्तेची व्यवस्था पाहण्यास सहकार्य करावे.
- नागरिकांनी स्वेच्छेने अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागांवर अतिक्रमणे करु नयेत.
- रस्त्याच्या दोन्ही बाजंना असणा-या वृक्षराजींचे जतन ही नागरिकांची सुध्दा जबाबदारी राहील.
- नागरिकांनी कायदेशीर तरतूदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.
- नागरिकांन सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

**३) <u>राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. ६, पुणे कार्यालयाची रचना.</u>**

राष्ट्रीय महामार्गासाठीचे हे कार्यालय शासनाने सन १९७० साली स्थापना केली आहे. या विभागाचे अंतर्गत सदयस्थितीत रा.म. उपविभाग क्र २४, पुणे व रा.म. उपविभाग क्र.८६, पुणे असे दोन उपविभाग कार्यरत असून त्यापैकी रा.म.उपविभाग क्र.२४, पुणे यांचे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे आहे.

**पुणे सोलापूर रस्ता रा.म.क्र.९ कि.मी.१४/० ते ४०/०**

सदर रस्ते लांबीतील चौपदरीकरणाचे काम बी.ओ.टी.बांधा वापरा हस्तांतर करा अंतर्गत सन २००४ मध्ये पूर्ण झालेले आहे.

टोल सुरु झाल्याचे दिनांक २७.१२.२००४ पासून

सवलत कालावधी दिनांक २७.१२.२०१९ पर्यंत

सदर लांबीचे देखभाल दुरुस्तीचे काम सवलत कालावधी संपेपर्यंत उद्योजकाकडून करण्यात येणार आहे.

पुणे सोलापूर रस्ता रा.म.क्र.९ कि.मी.४०/० ते ५५/० व कि.मी.१०३/० ते ११८/०

सदर लांबीमध्ये नियतकालीक दुरुस्ती अंतर्गत डांबरीकरणाचे काम (एस.डी.बी.सी.) दि.१८.२.२००८ साठी पूर्ण केलेले आहे. वरील लांबीचे दोषनिवारण कालावधी दि.१६.२.२०११ पर्यंत असून त्याची सर्व जबाबदारी संबंधीत ठेकेदारावर असून त्या कालावधीत रस्ता सुस्थितीत असलेबाबतचे काम या उपविभागाकडे आहे.

**रा.म.उपविभाग क्र.८६, पुणे-१**

**पुणे सोलापूर रस्ता रा.म.क्र.९ कि.मी.८/८०० ते १४/०**

सदर रस्ते लांबीसाठी या चौपदरीकरणासाठीचा सविस्तर प्रस्ताव अंदाजपत्रकासह जुलै २००९ मध्ये केंद्रीय परिवहन मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडे मंजुरीस्तव सादर करणेत आलेला आहे. अंतिम मंजुरी प्रतिक्षाधीन आहे. मंजुरी प्राप्त होताच चौपदरीकरणाचे काम या उपविभागामार्फत सुरु करणेत येईल. या प्रकरणांतर्गत इतर अनुषंगीक कामे जसे भूसंपादन वृक्षतोड व वृक्ष पूर्नवसन हि कामे जवळ जवळ पूर्ण असून सेवावाहिन्या हलविण्याचे काम वेगवेगळया संबंधीत खात्यामार्फत सुरु आहे.

कात्रज (पुणे) ते जुना कात्रज बोगदा ते शिंदेवाडी रस्ता विशेष राज्यमार्ग (दर्जावनत) कि.मी.८२५/५०० ते ८३४/० (घाट रस्ते लांबी)

सदर रस्ते लांबी देखभाल व दुरुस्तीसाठी या उपविभागाकडे असून त्यासाठी लागणारे अनुदान महाराष्ट्र शासनाकडून दिले जाते.

या रस्त्याचे लांबीत पूरहानी दुरुस्ती अंतर्गत डांबरीकरणाचे काम झालेले असून त्याचा दोष निवारण कालावधी  दि.२५/५/२०११ पर्यंत आहे.

जुन्या कात्रज बोगद्यात कॉंक्रीट रस्त्याचे काम विशेष दुरुस्ती अंतर्गत पूर्ण असून त्याचा दोष निवारण कालावधी दि.१३/४/२०११ पर्यंत आहे.

आज रोजी सदर घाटरस्ता व बोगदा वाहतुकीसाठी नागरिकांसाठी सुस्थितीत आहे.

या विभागाचे क्षेत्रिय कार्यकारी अभियंता यांचे अधिपत्याखाल एकूण २ उपविभागीय अभियंता, ११ शाखा अभियंता, ४ स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कार्यरत आहेत. या विभागाच्या कार्यक्षेत्राचा नकाशा नागरिकांचे सनदेने सुरुवातीला दर्शविणेत आलेला आहे.

कार्यकारी अभियंता व त्यांचे अधिनस्त कार्यरत उपविभागीय अभियंता यांची मुख्यालये दर्शविणारा वृक्ष तक्ता (Tree Chart) परिशिष्ट अ म्हणून सोबत जोडला आहे.

**४) <u>ह्या कार्यालयांतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक माहितीची सुलभता व खाजगीकरण करणे.</u>**

**अ) कार्यपुर्तीचे वेळापत्रक**

राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.६, पुणे कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विविध नाहरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी लागणारा कालावधी त्यास सक्षम अधिकारी इ.ची माहिती तसेच रस्ते पूल व इमारती आणि इतर कामा विषयीची माहिती कार्यपुर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट ब) मध्ये नमूद केली आहे. अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे याची माहिती विहित फी भरुन कार्यालयात मिळू शकेल. नैसर्गिक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ.उद्‌भवल्यास या वेळापत्रकातील कार्यपुर्तीच्या कालावधीत वाढ होवू शकेल.

ब) माहितीची सुलभता

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या वेबसाईटवरुन (संकेत स्थळावरुन) वेळोवेळी सादर केल्या जाणा-या विभागांतर्गत माहितीचा तपशील व आकडेवारीचा तपशील जनतेला सुलभतेने उपलब्ध होईल.

क) खाजगीकरण

विशेषतः शहरी भागाच्या विकास कामांसाठी व मोठ्या प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पातुन उपलब्ध होणारा अल्प निधी व काळाची गरज, या कारणांमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर सुरु केला आहे. यामुळे ग्रामीण भागाकडे अधिक विकास निधी उपलब्ध करणे शक्य होणार आहे. कार्यक्रमाची परिणामकारकता, जनतेचे अभिप्राय इत्यादीचा अभ्यास करुन पुढल दिशा व धोरण शासनस्तरावर ठरविले जाते.

**५) राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.६, पुणे कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता**.

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांची सुरक्षितता वाढविण्यासाठी अपघात निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन रस्त्यांवरील अपघात प्रवण स्थळे शोधते व अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

समितीने सुचविलेल्या स्थळांची सुधारणा टप्प्या टप्प्याने हाती घेण्यात येते. तपशीलवार व आवश्यक असे माहिती फलक रस्त्यांवर लावले जातील, जेणेकरुन रस्ते वाहतुकीस पादचा-यांसह सर्वांना सर्वकाळ सुरक्षित राहतील.

**६) गा-हाण्यांचे निराकरण सनदेचा आढावा, व जनसामान्यांच्या सूचना.**

अ) गा-हाणी/तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी विभागाबाबत अथवा काही कामाबाबत तक्रारी असतील तर, त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असेल तर त्या कार्यालयास वरिष्ठ कार्यालय प्रमुखांकडे तक्रार नोंदवावी म्हणजे उदाहरणार्थ उपविभागीय कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रारी असल्यास विभाग कार्यालय प्रमुखांकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे, तक्रार नोंदवावी व विभाग कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंत्यांकडे गा-हाणे मांडावे, तक्रार नोंदवावी व मंडळ कार्यालयाविरुध्द गा-हाणे/तक्रार असल्यास मुख्य अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावी, तक्रार नोंदवावी. अशा गा-हाणी/तक्रारींचे निराकरण वरिष्ठ कार्यालयाकडून ७ दिवसात करण्यात येईल.

गा-हाणी/तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यात येत आहे. गा-हाणी समक्ष भेटीत/पत्राने वा ईमेल द्वारेही नागरिक मांडू शकतात.

ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा/सिंहावलोकन

या विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा सा.बां.प्रादेशिक विभाग, पुणे अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यात येईल.

क) जनसामान्यांकडून सुचना

या विभागाची ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभिर्यपुर्वक विचार करुन त्यात वेळोवेळी सुधारणा घडवुन आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहुन काही नवीन कायदेशीर हक्क निर्माण करीत नाही. ती ग्राहकांना म्हणजेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

**७) नागरिकांच्या सनदेची अमंलबजावणी**

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.६, पुणे हे कार्यालय नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देवून नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करुन योग्य ते बदल आवश्यकते नुसार करण्यात येतील. राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.६, पुणे हे कार्यालय खात्रीपूर्वक गुणवत्तेची सेवा पुरविण्याची हमी देत आहे. ह्या कार्यालयाच्या अखत्यारीतील कुठल्याही माहितीसाठी नागरिकांना संवेदनशील सौजन्यपूर्ण व मदत करण्याच्या भावनेने आदरपूर्वक वर्तणूक मिळेल. कार्यपध्दती अधिक लोकाभिमुख, सुलभ व आटोपशीर करण्यासाठी नागरिकांचा सल्ला घेतला जाईल. भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल. तसेच नागरिकांच्या गा-हाण्यांचे कालबध्द निराकरण करणेत येईल.

**८) परिशिष्टे**

अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता (Tree chart)


ब) कार्यपुर्तीचे वेळापत्रक :- सदर प्रमाणे.

# परिशिष्ट (अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्षतक्ता
# (Tree chart)

## कार्यकारी अभियंता
## राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.६,
## पुणे-१

ERROR: undefined
OFFENDING COMMAND: F2S7DYF

STACK:




सुची

| अ.क. | रस्त्याचा प्रकार | याप्रमाणे |
|---|---|---|
| १ | द्रुतगती महामार्ग | |
| २ | राष्ट्रीय महामार्ग | |
| ३ | प्रमुख राज्य मार्ग | |
| ४ | रेल्वे मार्ग | |
| ५ | जिल्हा मुख्यालय | |